Anekant Education Society's
## Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 166 Displayed on :31/07/2025

## केंद्र शासनाची दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना शै.वर्ष २०२५–२६

केंद्र शासन दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविते. तरी, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी नविन व नूतनीकरणाचे फॉर्म ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. तरी, विद्यार्थ्यांनी दिलेल्या नियम व अटींच्या आधीन राहून या **www.scholarships.gov.in** या वेबपोर्टलवर दि. ३१/१०/२०२५ पर्यंत अर्ज करण्याची मुदत आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी ११ वी, १२ वी व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे दिव्यांग विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

नियम व अटी –

१. अर्जदार हा भारताचा रहिवासी असावा.

२. अर्जदाराची अपंगत्व टक्केवारी ४० टक्के व त्यापुढील असावी.

३. अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.

४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.

५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख इतकी असावी.

६. एका कुटूंबातील फक्त २ अपंग अपत्यांनांच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे

१. विद्यार्थ्याचा फोटो.

२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.

३. पालकांचे मा. तहसिलदार यांचे सन २०२४—२५ चे वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र.

४. महाविद्यालयाची चालू वर्षाची फी भरल्याची पावती /रिसीट.

५. स्वत:च्या राष्ट्रीयकृत बॅंक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.

६. विद्यार्थ्याचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र राज्य शासनाच्या सक्षम वैद्यकिय अधिका—याने प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.

७. आधारकार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधारकार्ड नसेल तर त्या विद्यार्थ्याने नोंदणी आयडी स्लीप किंवा बॅंक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅनकार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत इ. यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

८. आधार क्रमांक बॅंक खात्याशी लिंक केलेला असणे आवश्यक आहे.

तरी, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसहित दि. ३१/१०/२०२५ पर्यंत 'प्रशासन भवन' स्कॉलरशिप विभागात जमा करावा. याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\jadhavns\jadhavns\Scholarship 2023-2024\Scholarship Notice 2023-2024\Handicapped Scholarship 2023-24.docx